दै. सकाळ

13 JUL 2017

# पिंपरी 'स्थायी'कडून मुंढे यांचे अभिनंदन

**पिंपरी, ता. १२ :** निगडी येथून पुणे महापालिका भवन या बसमार्गावर गुरुवारपासून (ता. १३) महिलांसाठी विशेष पीएमपी बससेवा सुरू करण्यात येणार आहे. त्याचबरोबर भोसरी ते इंद्रायणीनगर सेक्टर तेरा, तसेच इंद्रायणीनगर सेक्टर तेरा येथून पुणे रेल्वेस्थानक या मार्गावर प्रथमच बससेवा सुरू होणार आहे. या मागण्या मान्य केल्याबद्दल पीएमपीएमएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक तुकाराम मुंढे यांच्या अभिनंदनाचा ठराव स्थायी समितीच्या बैठकीत बुधवारी करण्यात आला.

पीएमपीच्या संचलन तुटीपोटी पाच कोटी ७२ लाख रुपये देणे, तसेच शैक्षणिक सहलीपोटी १६ लाख ५२ हजार रुपये देण्याचे प्रस्ताव स्थायी समितीने मंजूर केले.